**सरकारतर्फे सा.क्र. ३**

**शपथेवर**

माझे नांव : किरण विष्णु जाधव,
वय : ३५ वर्षे, धंदा : सेक्युरटी असिस्टंट,
राहणार : एस आय पी, मुंबई

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरू</u>** —

१. दि. ०२/१२/२०१७ रोजी मी पोलीस कॉ. म्हणुन स्थानिक गुन्हे शाखा, अहमदनगर येथे नेमणुकीस होतो. सदर दिवशी अवैद्य गुन्हेबाबत स.पो. नि. शरद गोरडे व पो. कॉ. वाबळे यांच्यासह माहिति घेत होतो. त्यावेळी शरद गोरडे यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, नेवासा शिवारात हंडी निमगाव येथे एक पांढ—या रंगाचा ढंपर शासकीय वाळु चोरून विक्री करण्याकरीता नगरच्या दिशेने घेवुन जात आहे. सदर माहिति मिळाल्यानंतर शरद गोरडे यांनी नेवासा पोलीस स्टेशनचे कॉ. आजबे यांना बोलावुन घेवुन सदर माहिति सांगितली. माहिति मिळाल्यानंतर मी, गोरडे, वाबळे असे सर्वजण हंडीनिमगावच्या हद्दीतील रिलायन्स पेट्रोल पंपाचया समोर सापळा लावुन रात्री १०.३० वाजता थांबलो होते. त्यावेळी एक पांढ—या रंगाचा ढंपर नेवासा फाटयाकडुन अहमदनगर कडे जाताना दिसुन आला. त्यावेळी आम्ही हात दाखवुन त्या ढंपर चालकास थांबण्यास सांगितले असता त्याने ढंपर रस्त्याच्या बाजुला लावला व तो थांबला. त्या चालकास आम्ही आमची ओळख देवुन ढंपरीच पाहणी केली असता त्यामध्ये ३ ब्रास वाळु दिसुन आली. तो ढंपर टाटा कंपनीचा पांढ—या रंगाचा होता व त्याचा नंबर एम एच १६ क्यु १९२७ असा होता. त्या चालकास वाळु वाहतुकीच्या परवान्याबाबत विचारले असता त्याने त्याच्याकडे परवाना नसताना वाळु चोरी करून विक्री करण्यासाठी जात आहे असे सांगितले. त्या चालकाने त्याचे नाव भारत माळी असे सांगितले. सदर वाळु चोरीची असल्याची खात्री पटल्यानंतर आम्ही सर्व स्टाफ गुन्हा नोंदवण्यासाठी नेवासा पोलीस स्टेशनला गेला. त्यानंतर पो. कॉ. सुरज वाबळे यांनी फिर्याद दिली. जो आरोपी विना परवाना वाळु वाहतुक करताना आढळुन आला त्याला पाहिल्यास

मी ओळखु शकतो. **नि. २७ वर आरोपी गैरहजेरी माफीचा अर्ज दाखल तो अर्ज आरोपीची ओळख न करण्याच्या अटीवर मंजुर.**

**सरतपास पुर्ण.**

**<u>आरोपीतर्फे विद्वान वकिल श्री. ए. टी. आगळे यांचेमार्फत उलटतपास सुरू.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, ज्या वाहनाने आम्ही कारवाई करण्यासाठी गेलो होते त्याचा क्रमांक मला सांगता येणार नाही. घटनास्थळ ते नेवासा पोलीस स्टेशन यातील अंतर किती आहे हे मला सांगता येणार नाही. परंतु घटनास्थळी पोहचण्यासाठी नेवासा पो. स्टेशनवरून अर्धा तास लागतो. घटनेबाबत गावचे कामगार तलाठी यांना माहिती दिली नव्हती. घटनेच्या वेळी पेट्रोल पंप सुरू होता. वाळुचे मोजमाप करण्याकरीता त्यावेळी आमच्याकडे कोणतेही साधन नव्हते. घटनेच्या अगोदर अवैद्य धंद्याविषयी माहिती घेताना कोणत्याही धंद्याची माहिती मिळाली नव्हती. घटनेच्या वेळी कारवाई करताना हंडीनिमगावच्या हद्दीमध्येच फिरत होतो परंतु नेमक्या कोणत्या ठिकाणी गेलो हे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, स.पो. नि. गोरडे यांनी पो. कॉ. आजबे यांना बोलावुन घेतले हे मी खोटे सांगत आहे.हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी अवैद्य धंद्याची माहिती घेत असताना मी हंडीनिमगाव हद्दीमध्ये होतो हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासात मी खोटे नमुद केलेले आहे. सरतपासात सांगितल्याप्रमाणे *'' वाळु चोरी करून विक्री करण्यासाठी जात आहे''* हे मी पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरून आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**

स्वाक्षरीत/—

(लीना अ. काळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४,नेवासा

दिनांक :०५/११/२०२५